# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,

अवसरी (खुर्द), ता. आंबेगाव, जि. पुणे ४१२ ४०५
दुरध्वनी क्रं. (०२१३३) २२५९०० फॅक्स (०२१३३) २३०५८३
ईमेल : gcoeara@gmail.com वेबसाईट : www.gcoeara.ac.in


जा.क्र.शाअसंमअ/आस्था/२०१५/ 3996 दिनांक: 05 DEC 2015

**परिपत्रक**

संदर्भ :- १.मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई याचे दि. ३०/०९/२०१५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त दि. १५/१०/२०१५

२.मा.सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचे परिपत्रक .क्रमांक विकापु/आस्था-३(ब)/परिपत्रक/२०१५/६०१९ दि.०१/१२/२०१५

सर्व विभाग प्रमुख यांना कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई येथे दि. ३०/०९/२०१५ रोजी झालेल्या आढावा बैठकीमध्ये सर्व कर्मचा-यांनी कार्यविवरण नोंदवही ठेवणेबाबत ठरविण्यात आलेले आहे. त्यानुसार मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांनी संदर्भ क्र. २ येथील परीपत्रकान्वये सर्व कर्मचा-यांना कार्यविवरण नोंदवही ठेवण्याबाबत, सूचित केले आहे. तसेच कर्मचारी ठेवत असलेल्या कार्यविवरण नोंद वही नियमित तपासणे व गोपनिय अहवाल लिहीतांना कार्यविवरण नोदवहीतील तपशिल विचारात घेणेबाबत सूचित केले आले आहे. तरी आपल्या विभागातील सर्व कर्मचारी यांना तत्काळ खालील प्रमाणे प्रपत्रात कार्यविवरण नोंदी ठेवणेबाबत सूचित करावे

(प्रा. एस. व्ही. जोशी)
प्र. प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
अवसरी (खुर्द) ता. आंबेगाव जि. पुणे

---

## कार्य विवरण नोंदवही

कर्मचा-याचे नाव :-

पदनाम :-

विभाग :-

| अ.क्र. | दिनांक | केलेल्या कामाचा तपशिल | संबंधित कर्मचारी यांची स्वाक्षरी | प्रतिवेदन अधिकारी यांची स्वाक्षरी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

प्रत:- विभाग प्रमुख :- यंत्र / अणुविद्युत / संगणक / स्थापत्य / उपकरणीकरण / स्वयंचल / उपयोजित विज्ञान / कर्मशाळा / ग्रंथालय / कार्यालय - यांना आवश्यक कार्यवाहीसाठी.

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
# अवसरी खुर्द, ता. आंबेगाव, जि. पुणे - ४१२ ४०५

दूरध्वनी - ०२१३३-२३०५८२

वेबसाईट - www.gcoeara.ac.in, ई मेल - gcoeara@gmail.com

जा.क्र. शाअसंवमअ / आस्था / २०१६ / १९४८ दि. 07 JUL 2016

**परिपत्रक**

विषय - कार्यविवरण नोंद वहीतील नोंदीबाबत

संदर्भ - परिपत्रक क्र. शाअसंमअ / आस्था / २०१५ / ३९९६, दि. ०५-१२-२०१५

संस्थेतील सर्व विभागप्रमुखांना कळविण्यात येते की संस्थेतील बरेच अधिकारी व कर्मचारी त्यांच्या कार्य विवरण पत्रामध्ये त्यांनी केलेल्या कामाच्या लांबलचक वर्णनात्मक नोंदी करीत असल्याचे व त्यामुळे कार्य विवरण नोंदवहीची जाडी विनाकारण बरीच वाढवीत असल्याचे निदर्शनास आले आहे. वस्तुतः अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या कामाचे मूल्यमापन हे त्या कामाच्या गुणवत्तेवरून तसेच ते काम किती तत्परतेने केले, विविध कामे हाताळण्याची क्षमता, निर्णयक्षमता, सर्वसाधारण बुद्धीमत्ता, सहकारी व जनता यांचेशी असलेले संबंध, संस्था स्तरावरील अन्य कामातील सहभाग इत्यादि अनेक बाबी विचारात घेवून केले जाते. या बाबत गोपनीय अहवालाच्या विहित नमुन्यातील मुद्दा क्र. १ ते १९ येथे स्पष्ट उल्लेख दिसून येतो. केवळ कामाचे लांबलचक वर्णन केले अथवा कार्य विवरण नोंदवहीची जाडी वाढवली म्हणजे आपले काम उत्तम दर्जाचे केले अथवा तत्परतेने केले असे नाही. त्यामुळे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की कार्य विवरण नोंदवहीत त्यांनी केलेल्या कामाच्या लांबलचक वर्णनात्मक नोंदी न लिहिता त्या कामाबाबत थोडक्यात ढोबळ आशयात्मक वर्णन करावे.

(प्रा. श्री. वि. जोशी),
प्र.प्राचार्य,
शा. अ. व सं. म. अवसरी

o/c

प्रत -

विभागप्रमुख - यंत्र / स्वयंचल / स्थापत्य / अणुविद्युत / संगणक / उपकरणीकरण / उपयोजित विज्ञान / कर्मशाळा / ग्रंथालय / प्रबंधक यांना - त्यांनी हे परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.